प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE
CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
**Regd. Office:** Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
**Head Office:** CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294;
For updated information, follow us on - @cidco_ltd :/cidco YouTube CIDCO Ltd. @cidco_ltd

दि. 23.02.2022

**सिडकोच्या महागृहनिर्माण योजना २०२२ ला १९,००० अर्जदारांनी नोंदणी करून दिला भरघोस प्रतिसाद**
**नागरिकांच्या विनंतीस्तव अर्ज नोंदणीस मुदतवाढ**

सिडको महामंडळाच्या 5,730 घरांच्या गृहनिर्माण योजनेकरिता ऑनलाइन अर्ज नोंदणी करण्याकरिता, नागरिकांच्या विनंतीस मान देऊन 24 मार्च 2022 पर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय सिडकोने घेतला असून या अनुषंगाने अनामत रक्कम व शुल्क भरणा, संगणकीय सोडत या प्रक्रियांनाही मुदतवाढ देण्यात आली आहे.

"सर्वसामान्यांच्या हक्काच्या घराचे स्वप्न पूर्ण व्हावे याकरिता सिडको नेहमीच कटिबद्ध आहे. सिडकोच्या नवीन वर्षातील या पहिल्या योजनेस उत्तम प्रतिसाद लाभला आहे. कागदपत्रांची जमवाजमव आणि अनामत रकमेची तजवीज करण्यास पुरेसा अवधी मिळावा म्हणून अर्ज नोंदणीकरिता मुदतवाढ देण्यात आली आहे. यामुळे जास्तीत जास्त नागरिकांना अर्ज करता येणार आहेत."

डॉ. संजय मुखर्जी
उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको

सिडको महामंडळाने 26 जानेवारी 2022 रोजी 5,730 घरांच्या गृहनिर्माण योजनेस प्रारंभ करण्यात आला. या योजनेंतर्गत नवी मुंबईतील वेगाने विकसित होणाऱ्या तळोजा नोडमध्ये 5,730 घरे (सदनिका) उपलब्ध करून देण्यात आली आहेत. एकूण 5,730 घरांपैकी 1,524 घरे ही प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकासाठी आणि उर्वरित 4,206 घरे ही सर्वसाधारण प्रवर्गासाठी उपलब्ध आहेत. या योजनेच्या ऑनलाइन अर्ज नोंदणीस 26 जानेवारी 2022 पासून प्रारंभ झाला असून योजनेस नागरिकांचा उत्तम प्रतिसाद लाभून आतापर्यंत 19,000 नागरिकांनी अर्ज नोंदणी केली आहे. योजनेकरिता अर्ज करण्यास 24 फेब्रुवारी 2022 ही अंतिम तारीख होती, परंतु कागदपत्रांची जमवाजमवी करण्यास आणि अनामत रकमेची तजवीज करण्यासाठी अर्ज नोंदणीस मुदतवाढ देण्याची विनंती नागरिकांकडून करण्यात येत होती. या विनंतीस मान देऊन अर्ज नोंदणी करण्याकरिता 24 मार्च 2022 पर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला आहे.

सुधारित वेळापत्रकाप्रमाणे ऑनलाइन अर्ज नोंदणी 24 मार्च 2022 पर्यंत करता येणार आहे. नोंदणीनंतर ऑनलाइन अर्ज व ऑनलाइन शुल्क भरणा 25 मार्च 2022 पर्यंत करता येणार आहे. स्वीकृत अर्जदारांची प्रारुप यादी 31 मार्च 2022 रोजी तर स्वीकृत अर्जदारांची अंतिम यादी 04 एप्रिल 2022 रोजी सिडकोच्या https://lottery.cidcoindia.com/ या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. योजनेची संगणकीय सोडत ८ एप्रिल 2022 रोजी पार पडणार आहे.

तळोजा नोड नवी मुंबईतील वेगाने विकसित होणार नोड आहे. मुंबई-पुणे महामार्ग, रेल्वे आणि सिडकोचा मेट्रो प्रकल्प, यांमुळे या नोडला उत्तम कनेक्टिव्हिटी लाभली आहे. मेट्रोचे आगार तळोजा येथे असून मेट्रो मार्गेही हा नोड सीबीडी बेलापूरला जोडला जाणार आहे. या नोडमधील काही क्षेत्र हे शाळा, पदवी महाविद्यालये, प्रार्थनास्थळे, रुग्णालये, समाजकेंद्रे, वसतिगृहे इ. सामाजिक उद्देशांकरिता राखीव आहे. मेट्रो रेल्वेच्या स्थानकांलगत वाणिज्यिक उपक्रमांकरिता काही क्षेत्र हे सिडकोकडून निश्चित करण्यात आले आहे. यामुळे तळोजा नोडमध्ये मोठ्या प्रमाणावर वाणिज्यिक संधी निर्माण होणार आहेत. परवडणाऱ्या दरातील घरे, कनेक्टिव्हिटी, रोजगार, वाणिज्यिक प्रकल्प यांमुळे तळोजा नोड हा नवी मुंबईतील वास्तव्यासाठी सर्वोत्तम पर्याय ठरणार आहे. तरी दिलेल्या मुदतवाढीचा फायदा घेऊन अधिकाधिक नागरिकांनी अर्ज करावा आणि नवी मुंबईमध्ये आपले हक्काचे घर घेण्याचे स्वप्न साकार करावे, असे आवाहन सिडकोकडून करण्यात आले आहे.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

मा. संपादक महोदय,
वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धि देऊन उपकृत करावे, ही विनंती.

**जनसंपर्क विभाग, सिडको**